गट "क" व "ड" (वर्ग ३ व ४) मधील
कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध
नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासंबंधी
योजना.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकःवेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा-३.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२., दिनांक ३ ऑगस्ट २००१

वाचाः- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, कम्रमांकःएसआरव्ही १०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ८ जून १९९५

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःएसआरव्ही १०९५/प्र.क्र.३३/९५/बारा, दिनांक १ नोव्हेंबर १९९५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःएसआरव्ही १०९६/प्र.क्र.३३/९५/बारा, दिनांक २० मार्च १९९७.

(४) शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्रमांकःवेपुर-१२९८/प्र.क्र.१३/ ९८/सेवा-१०, दिनाक १० डिसेंबर १९९८.

शासन निर्णय

गट "क" व "ड" (वर्ग-३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना उपरोल्लेखित अनुक्रमांक (१) येथील शासन निर्णयानुसार १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे. वर नमूद केलेल्या अनुक्रमांक(३) येथील शासन निर्णयानुसार गट "य" मधील अराजपत्रित कर्मचाऱ्यांनाही वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे. पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचाऱ्यांना तसेच एकाकी पदावरील कर्मचाऱ्यांना दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे वरिष्ट वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे. शासन अधिसूचना, वित्त विभाग दिनांक १०डिसेंबर १९९८ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या ओत. सुधारित वेतनश्रेणीच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक ८ जून १९९५ सोबतच्या परिशिष्टातील वेतनश्रेणी सुधारण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता याबात खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(१) ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाखळीत पदोन्नतीसाठी पद उपलब्ध नाही अशा कर्मचाऱ्यांना तसेच एकाकी पदावरील कर्मचाऱ्यांना दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीची (वरिष्ठ) वेश्तनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे त्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ठ एक मध्ये नमूद केल्याप्रमाणे समकक्ष सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील.

(२) ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ राजी अथवा त्यानंतर कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय आहे, परंतु पदोन्नतीसाठी पद उपलब्ध नाही अशा कर्मचाऱ्यांना तसेच एकाकी पदावरील कर्मचाऱ्यांना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट - दोन मध्यं नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीची (वरिष्ठ) वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील.

(३) दिनांक १ जानेवारी १९९६ पासून समकक्ष सुधारित वेतनश्रेणीहून वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत अशा एकााकी पदांच्या बाबतीत दिनांक १ जानेवारी १९९६ रोजी व त्यानंतर कालबध्द पदोन्नतीस पात्र होणाऱ्या कर्मचाऱ्यांना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट - दोन मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल. तसेच दिनांक १ ऑक्टोबर १९९४ ते दिनाक ३१ डिसेंबर ुं९९५ या कालावधीत कालबध्द पदोन्नती योजेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेल्या अशा कर्मचाऱ्यांना दिनाक १ जानेवारी १९९६ पासून त्यांच्या कनिष्ठाप्रमाणेच परिशिष्ट - दोन मध्ये नमूद केल्याप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल.

(४) पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार ज्या कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे पद व निम्न पद एकाच वेतनश्रेणीतील आहे अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी विहीत करताना उचित विशेष वेतन देखील लागू होईल.

३. या सुधारित वेतनश्रेणीच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून एक महिन्याच्या आत विकल्प देणे आवश्यक राहील. या विकल्पाबाबतच्या इतर तरतूदी

दिनांक १० डिसेंबर १९९८ च्या अधिसूचनेमधील नियम क्रमांक ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील. परिशिष्ट - एक व दोन मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना देय होणारी थकबाकीची रक्कम शासन अधिसूचना, वित्त विभाग दिनांक १० डिसेंबर १९९८ च्या परिच्छेद ११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधितांना प्रदान करण्यात यावी.

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श. वि. लागवणकर)
सह सचिव, वित्त विभाग.

प्रतिः

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ महाराष्ट्र, नागपुर,
महालेखापाल (लेखा परिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परिक्षा) -२ महाराष्ट्र नागपुर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मुख्य सचिवांचे उपसचिव,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय (५०० प्रती)
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख, प्रादेशिक प्रमुख व कार्यालयीन प्रमुख,
* प्रबंधक उच्च न्यायालय, (मूळ शाखा) मुंबई,
* प्रबंधक उच्च न्यायालय, (अपील शाखा) मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्रमांक ३ व ४,
अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
सीनीयर रिसर्च ऑफीसर, मे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग)
खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक लेखा निधी हिशेब, मुंबई,

उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/ नागपुर/ औरंबाद /नाशिक/अमरावती,
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, सेवा -३, वित्त विभाग,

परिशिष्ट - एक

शासन निर्णय क्रमांक:वेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा-३

दिनांक ३ ऑगस्ट २००१ सोबतचे परिशिष्ट - एक

(कालबध्द पदोन्नती यसोजनेअंतर्गत देय ठरलेल्या असुधारित वेतनश्रेणी करीता अनुज्ञेय होणारी सुधारित वेतनश्रेणी)

अ.क.	पदोन्नती विद्यमान (दिनांक १-१-१९९६ पूर्वीची) अनुज्ञेय वेतनश्रेणी (रु.	पदोन्नतीची अनुज्ञेय सुधारित (दिनांक १-१-१९९६ पासूनची) वेतनश्रेणी (रु.)
१,	७७५-१२-९५५-दरो-१५-१०३-२०-११५०	२६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००
२.	९५०-२०-११५०-दरो-१५-१४००	३०५०-७५-३९५०-८०-४५९०
३.	९५०-२०-११५०-दरो- -२५-१५००	३०५०-७५-३९५०-८०-४५९०
४.	१२००-३०-१४४०-दरो-३०-१८००	४०००-१००-६०००
५.	१२००-३०-१५६०-दरो-४०-२०४०	४०००-१००-६०००
६.	१३२०-३०-१५६०-दरां-४०-२०४०	४०००-१००-६०००
७.	१३५०-३०-१४४०-४०-१८००-दरो-५०-२२००	४५००-१२५-७०००
८.	१४००-४०-१८००-दरो-५०-२३००	४५००-१२५-७०००
९.	१६००-५०-२३००-दरो-६०-२६६०	५०००-१२०-८०००
१०.	१६४०-२६००-दरो-७५-२९००	५५००-१७५-९०००
११.	२०००-६०-२३००-दरो-७५-३२००	६५००-२००-१०५०००
१२.	२०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५००	६५००-२००-१०५००

<u>परिशिष्ट - दोन</u>

शासन निर्णय क्रमांक:वेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा-३,
<u>दिनांक ३ ऑगस्ट २००१ सोबतचे परिशिष्ट - दोन</u>

(पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या स्वीकृत शिफारशीनुसार पदास विहित केलेल्या सुधारित वेतनश्रेणीकरिता कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत अनुज्ञेय होणारी वरिष्ठ सुधारित वेतनश्रेणी)

अ.क्र.	विद्यमान सुधारित वेतनश्रेणी	पदोन्नतीची सुधारित वेतनश्रेणी
१.	२५५०-५५-२६६०-६०-३२००	२६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००
२.	२६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००	३०५०-७५-३९५०-८०-४५९०
३.	२६५०-६५-३३००-७०-४०००	३०५०-७५-३९५०-८०-४५९०
४.	२७५०-७०-३८००-७५-४४००	३०५०-७५३९५०-८०-४५९०
५.	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	४०००-१००-६०००
६.	३२००-८५-४९००	४०००-१००-६०००
७.	४०००-१००-६०००	४५००-१२५-७०००
८.	४५००-१२५-७०००	५५००-१७५-९०००
९.	५०००-१५०-८०००	५५००-१७५-९०००
१०.	५५००-१५०-८०००	५५००-१७५-९०००
११.	६५००-२००-१०५०० (पूर्वीच्या रु.२०००-३२०० या या असुधारित वेतनश्रेणीतील अराजपत्रित कर्मचारी)	६५००-२००-१०५०० अधिक विशेष वेतन रु.४०० दरमहा.